**मध्यवर्ती परिसर, मफुकृवि, राहुरी येथे Model Genome Club उभारणे व बळकटीकरण करणेबाबत.**

---

**सन २०२२-२३ ते २०२३-२४**

# महात्मा फुलेकृषि विद्यापीठ
## राहुरी, जि. अहमदनगर

---

**विद्यापीठ निर्णय जा.क्र.एमटीजी-३(७२७)/२१३/२०२३,** **दि. १४/०७ /२०२३**

**वाचा :-** १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शा.नि.मफुकृवि-१४२३ /प्र.क्र.३०/७-अे दि. २१ फेब्रुवारी २०२३.

२. कार्यकारी परिषदेच्या ३३८ व्या बैठकीतील ठराव क्र.१५/का.प.बै.३३८ (२८.०३.२०२३)

**पार्श्वभूमी :-**

एकांगी पध्दतीच्या पिक वाण सुधारणेमुळे जैवविविधता दुर्मिळ होत आहे. पिकांमधील जनुकीय विविधता टिकवणे हे शाश्वत शेती विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. वातावरण बदलाच्या परिस्थितीत शाश्वत शेतीकरिता लोक सहभागातून उपलब्ध जैवविविधतेचे, त्यातील वैशिष्टयपूर्ण गुणधर्मांचे संवर्धन/ जतन करणे गरजेचे आहे. बदलत्या वातावरणात तग धरणाऱ्या, पोषण समृध्द आणि रोग किडीस प्रतिकारक्षम स्थानिक वाणांचे संकलन करुन, जैवविविधता नोंदवहीत नोंदी ठेवणे याकरिता स्थानिक शेतकऱ्यांचा संवर्धनातील सहभाग महत्वाचा आहे.

लोक सहभागातून गावपातळीवर संवर्धन केंद्रे / बियाणे बँक तयार करुन जैवविविधतेचे लोक सहभागातून संवर्धन करणे व जैवविविधता संवर्धन करणाऱ्या संवर्धकास प्रवृत्त करणेकरिता विविध पुरस्कार देणे गरजेचे आहे. जैवविविधता संवर्धनाच्या अनुवंशीक आणि कायदेशीर बाबींवरील साक्षरता आणि जागरुकता मोहिम राबविणे याकरिता संदर्भ क्र. ०१ या शासन निर्णयान्वये "Establishment of Model Genome Club (MGC) for sustainable Agricultural Development" प्रकल्प, म.फु.कृ.वि., राहुरी येथे राबविण्यास राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत रु.४३.९० लाख निधी मंजूर करण्यात आला आहे.

**विद्यापीठ निर्णय :-**

कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, मध्यवर्ती परिसर, म.फु.कृ.वि., राहुरी येथे Model Genome Club या प्रकल्पास संदर्भ क्र.१ अन्वये रु. ४३.९० लाख रक्कमेस मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत रु. ४३.९० लाख अर्थसहाय्यचा "Establishment of Model Genome Club (MGC) for sustainable Agricultural Development" हा प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राबविण्यास संदर्भ क्र. १ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा मुळ उद्देश साध्य होण्यासाठी संदर्भ क्र. २ अन्वये ३३८ व्या बैठकीत कार्यकारी परिषदेने महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील कलम ३१ (८) व ३१ (१०) अन्वये प्राप्त निधीपैकी रु. ४३.९० लाख अखर्चीत निधी प्रकल्पाच्या उद्दिष्टे पूर्तीसाठी सन २०२२-२३ ते २०२३-२४ या दोन वर्षांच्या कालावधीत खर्च करण्यास मान्यता प्रदान केली.

प्रकल्पाच्या खर्चाकरिता निधी उपलब्धतेचा तपशील व कंत्राटी मनुष्यबळाचा तपशील **परिशिष्ठ-अ** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

सदर मॉडेल जिनोम क्लबसाठी प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी हे मुख्य समन्वयक तर सहाय्यक प्राध्यापक, राज्यस्तरीय जनुक पेढी, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, प्रभारी अधिकारी, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प, व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, म.फु.कृ.वि., राहुरी हे सह-समन्वयक म्हणुन काम पाहतील. प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी यांच्याकडे या प्रकल्पाचे प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रण राहील व ते आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन काम पाहतील. तसेच संपूर्ण नियंत्रण संचालक संशोधन, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडे असेल.

विहीत सर्व निकषांन्वये अंमलबजावणीचे तटस्थ वार्षिक मूल्यमापन संचालक (संशोधन), मफुकृवि, राहुरी व संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन) कृषि आयुक्तालय, पुणे यांचे स्तरावरुन करण्यात यावे व तसा मुल्यमापन तथा फल निष्पत्तीचा वार्षिक अहवाल मा. कुलगुरु महोदय यांना दरवर्षी सादर व्हावा.

सदरचा विद्यापीठ निर्णय नियंत्रक, म.फु.कृ.वि., राहुरी यांचे अनौपचारीक संदर्भ क्र.५९१ व्हीसी. दिनांक ०४/०७/२०२३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

*स्वाक्षरीत/-*
**(विठ्ठल शिर्के)**
**कुलसचिव**

**प्रत माहिती व कार्यावाहीस्तव-**

१. सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मादाम काम रोड, हुतात्मा राजगुरु चौक, नरीमन पॉईट, मुंबई ४०० ०३२.
२. संचालक (संशोधन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११ ००७.
३. संचालक, विस्तार शिक्षण/संशोधन/शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
४. अधिष्ठाता (कृषि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
५. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)
६. विभाग प्रमुख (सर्व)
७. सहयोगी संशोधन संचालक (सर्व)
८. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व)
९. प्रभारी, कृषि संशोधन केंद्र/ प्रकल्प (सर्व)
१०. विद्यापीठ ग्रंथपाल/ नियोजन अधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
११. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
१२. उप कुलसचिव (प्रशासन)/ (विद्या), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
१३. अधिदान व लेखाधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
१४. मा. कुलगुरु/ कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

AsPadvi
**(आशा बा. पाडवी)**
**उप-कुलसचिव (प्रशासन)**

# परिशिष्ट - अ

**"Establishment of Model Genome Club (MGC) for sustainable Agricultural Development"**

**मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**निधी उपलब्धतेचा तपशील (सन २०२२-२३ ते २०२३-२४)**

| तपशील | सन २०२२-२३ (एकुण किंमत) | सन २०२३-२४ (एकुण किंमत) | प्रकल्प एकुण किंमत | रा.कृ.वि.यो अंतर्गत प्रकल्पास मंजूर निधी (१००%) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ (२+३) | ५ |
| **अ) अनावर्ती निधी (उपकरणे व मालमत्ता)** | | | | |
| १) संगणक (मल्टीमिडिया) (०२) | २.० | - | २.० | २.० |
| २) एलसीडी प्रोजेक्टर (०१) | १.५ | - | १.५ | १.५ |
| ३) इंटरएक्टिव्ह इलेक्ट्रॉनिक बोर्ड (०२) | ३.० | - | ३.० | ३.० |
| ४) डिस्प्ले पॅनेल/ बोर्ड (१०-१५) | २.० | - | २.० | २.० |
| ५) फर्निचर आणि फिक्स्चर | ३.० | - | ३.० | ३.० |
| ६) रेफ्रिजरेटर, टीव्ही, वॉटर कुलर (प्रत्येकी ०१) | २.० | - | २.० | २.० |
| **एकुण (अ)** | **१३.५** | - | **१३.५** | **१३.५** |
| **ब) आवर्ती निधी** | | | | |
| १) प्रोजेक्ट असोसिएट- ०२ (रु. २०,०००/प्रत्येकी महिना) | ४.८ | ४.८ | ९.६ | ९.६ |
| २) तांत्रिक मदतनीस- ०२ (रु. १०,०००/प्रत्येकी महिना) | २.४ | २.४ | ४.८ | ४.८ |
| ३) विविध कार्यक्रम आयोजित करण्यासाठी ऑपरेशनल खर्च व ०इतर विधिक्त खर्च इ. | ५.० | ५.० | १० | १० |
| ४) प्रशिक्षक आणि तज्ञांसाठी प्रवास खर्च, शेतकरी/ समाजासाठी मानधन आणि सन्मान पुरस्कार | ३.० | ३.० | ६.० | ६.० |
| **एकुण (ब)** | **१५.२०** | **१५.२०** | **३०.४०** | **३०.४०** |
| **एकुण (अ+ब)** | **२८.७०** | **१५.२०** | **४३.९०** | **४३.९०** |
| **एकुण निधी - रु. ४३.९० लक्ष (अक्षरी रुपये त्रेचाळीस लाख नव्वद हजार फक्त)** | | | | |

ASPadvi

**(आशा पाडवी)**

**उप-कुलसचिव (प्रशासन)**